# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईदर, वसई-विरार**

पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

**कार्यालयाचा पत्ता-** रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि. ठाणे फोन नंबर ०२२ - २९४५१००१

**Email ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट १४/२०२५ दि. १०/०१/२०२५

## अनधिकृतरित्या नालासोपारा पोलीस ठाणे हद्दित वास्तव्यास असलेल्या एका महिला बांग्लादेशी नागरीकांवर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष,नालासोपारा पथकाची कारवाई.

दिनांक ०९/०१/२०२५ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष,नालासोपारा यांना बातमीदारामार्फत नालासोपारा पोलीस ठाणे हद्दीतील न्यु पाटणकर पार्क को.ऑप.हौ.सोसा.लि. पाटणकर पार्क नालासोपारा पश्चिम ता.वसई जि.पालघर या ठिकाणी बांगलादेशी नागरीक विनापरवाना राहत असल्याची माहिती मिळाली.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने पोलीस पथक, पंच व दुभाषिक यांचेसह न्यु पाटणकर पार्क को.ऑप.हौ.सोसा.लि नालासोपारा पश्चिम ता.वसई जि.पालघर या ठिकाणी सापळा रचुन ०१ महिला नामे श्रीमती नेहरून अजीजुल शेख, वय ३७ वर्षे, नालासोपारा पश्चिम, ता.वसई, जिल्हा पालघर,मुळ रा.लखोवटी, ता.बराकपुर, जि.खुलना, देश बांग्लादेश या बांग्लादेशी महिलेस ताब्यात घेवुन दुभाषिकामार्फत चौकशी केली असता, ती भारतात विनापरवाना सुमारे १७ वर्षापासून राहत असल्याची माहिती मिळाली. दुभाषिकामार्फत तिच्याकडे अधिक चौकशी केली असता चौकशीत तिने ती बांग्लादेशी नागरीक असल्याचे कबुल केल्याने तसा सविस्तर पंचनामा करुन तिस ताब्यात घेवुन सदर महिलेविरुद्ध सरकारतर्फे फिर्याद दिल्याने नालासोपारा पोलीस ठाणे गु.रजि.नं. ०७/२०२५ भारतीय पासपोर्ट अधिनियम १९५० चे कलम ३(अ),६(अ),सह विदेशी अधिनियम १९४६ चे कलम १४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही मा.पोलीस उपआयुक्त श्री अविनाश अंबुरे (गुन्हे), सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.मदन बल्लाळ यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा युनिटचे पोनि/सौरभी पवार, मपोहवा/साक्षी डोईफोडे, पोहवा/रोशन किणी, पोहवा/महेंद्र शेटये, पोहवा/अमित चव्हाण, मपोशि/काजल पाटील, पोहवा/सुनिल पागी, सर्व नेम.अनै.मा.वा.प्रति. कक्ष नालासोपारा यांनी उत्कृष्ठरित्या केली आहे.

------------00000-------------